
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय सा. वा
दा. क्र. १५५६४




# खानाची फजिती

दत्ता श्री. टोळ



IRBK-0115564


ग्रा.वा. १५५६४
२५।९।७४

नाटयरूप शिवशाही

नाटिका ६ वी

संपादक : डॉ. म. वि. गोखले

एम.ए., पीएच्.डी.



# खानाची फजिती

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. १५५६४ नों. दि. २५।९।७४
वि. ................ क्र. ..................

लेखक

**दत्ता श्री. टोळ**

IRBK-0115564

प्रकाशन क्रमांक १५३

किंमत १ रुपया

सदर नाटिकेचा पूर्णतया वा अंशतः, सशुल्क वा विनामूल्य प्रयोग वा नाटचवाचन करणे झाल्यास पुढील पत्त्यावर प्रत्येक प्रयोगाचे रु. पंधरा पाठवून पूर्व परवानगी घेणे जरूर आहे.

पत्ता :– सौ. अ. द. टोळ, ७३३ रविवार पेठ, पुणे २

प्रकाशिका : सौ. निर्मला नारायण अरगडे, सौ. मालिनी माधव कुलकर्णी
अरगडे कुलकर्णी प्रकाशन १६/२२४ लोकमान्यनगर, पुणे ३०

© सर्व हक्क प्रकाशिकेंच्या स्वाधीन

प्रथमावृत्ती : जून १९७४

मुद्रक : सौ. वसुधा रघुनाथ खरे, अक्षर मुद्रणालय, ४७ इंडस्ट्रियल इस्टेट,
नागरगाव, लोणावळा (जि. पुणे)

नाट्यवेड्या बालमित्रांनो,

हा जून १९७४ ! म्हणजे ठीक ३०० वर्षापूर्वी (जून १६७४ मध्ये) महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला चेतना देणारी एक महान घटना घडली ! श्रीशिवाजीराजे यांनी हिंदवी राज्याचो मुहूर्तमेढ रोवून स्वतःला राज्याभिषेक करून घेतला. हिंदवी स्वराज्याचा हा छत्रपती म्हणजे गुणसागरच होता !

जाणिवेच्या रवीला रसिकतेचा दोर लावून या श्रीशिवचरित्ररूपी गुण-सागराचे मंथन केले तर नानाविध गुणांचे नवनीत घुसळून वर येते. साहस, शक्ती, युक्ती, न्यायप्रियता, शिस्तप्रियता, दूरदर्शीपणा, नीतिमानता, संस्कार-क्षमता—किती किती म्हणून त्यांचे गुण सांगावे !

अशा या लोकोत्तर पुरुषश्रेष्ठाच्या चरित्रातील निवडक प्रसंगाचे नाट्य-रूप दर्शन घडवून, त्यांच्या विविध गुणांचा परिचय आमच्या बालमित्रांना करून द्यावा, यासाठी ही **'नाट्यरूप शिवशाही'** निर्माण केली आहे. रंजना-बरोबरच ध्येयसिद्धी असा हा योग आहे. तुम्हाला तो आवडेलच आवडेल !

११/२७७, लोकमान्यनगर
पुणे ३०
जून १९७४

सूत्रधार— नाट्यरूप शिवशाही

# शिक्षक, दिग्दर्शकास निवेदन

मित्रहो,

सदर नाटिका केवळ वाचनापेक्षा, तिचा प्रयोग रंगतदार, रंजक कसा होईल याकडे अधिक लक्ष दिले आहे. त्यासाठी लग्नाची वरात, दोघा पहारेकऱ्यांची शिवाजीशी भेट, मुदपाकखान्याजवळचा प्रसंग हे जास्तीत जास्त वेळ रंगवावेत. वरात, भवानीमातेचे दर्शन इ. प्रसंग कसे दाखवायचे हे दिग्दर्शकाच्या कल्पनाशक्तीवर अवलंबून राहील. मात्र पुरेशी साधने उपलब्ध नसतील तर हे प्रसंग गाळले तरी चालतील.

नाट्यवाचनासाठीही ही नाटिका परिणामकारक ठरेल असा विश्वास वाटतो. प्रयोगासंबंधी काही मार्गदर्शन हवे असेल, काही सूचना असतील, तर जरूर कळवा. शक्यतेनुसार त्यांचा विचार करीन.

दत्ता श्री. टोळ.

### –: पात्र परिचय :–

| | | |
|---|---|---|
| शिवाजी | : | शिवाजीराजे भोंसले. |
| चिमणाजी | : | शिवाजी राजांचे सरदार |
| नेताजी | : | ,, |
| मोरोपंत | : | ,, |
| सोनोपंत | : | ,, |
| बहिर्जी | : | शिवाजीराजांचा हेर |
| सर्जेराव | : | शिवाजीराजांचा सरदार |
| प. पहारेकरी | : | मुसलमान पहारेकरी |
| दु. पहारेकरी | : | ,, |
| प. मावळा | : | शिवाजीचे सैनिक |
| दु. मावळा | : | ,, |
| प. शिपाई | : | लालमहालातले पहारेकरी |
| दु. शिपाई | : | ,, |
| नर्तकी | : | खानासमोर नृत्य करणारी– |
| शाहिस्तेखान | : | मोंगलांचा सुभेदार |

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. १९५६४ नों. दि २५।१२।७८
वि. बा. अ ... क्र. ...

# खानाची फजिती

(पडदा उघण्यापूर्वी पुढील समूहगीत चालू होते)

चला मुलांनो यारे यारे  सारे तुम्ही सारेजण
हिंडून येऊ पाहून घेऊ  भारत अपुला जगी महान–
गड पुरदंर कोंडाणा  किल्ले द्योतक शौर्याचे
गंगा यमुना सरस्वती  पावित्र्याचें नद इथले
भारताची लेणी घ्यारे  पाहुनिया डोळे भरून

नंतर पुढील निवेदन—

**निवेदक** : असा आहे आपला महान भारत. ह्या भारतात अनेक थोर स्त्री-पुरुष रत्ने होऊन गेली. गोब्राह्मणप्रतिपाळक हिंदुपतपादशहा छत्रपती शिवाजीमहाराज हे त्यापैकी अग्रगण्य! शिवाजी म्हणजे मूर्तिमंत साहस. शिवाजी म्हणजे शौर्य आणि पराक्रम यांचे आगळे रूप. शिवाजी म्हणजे मांगल्य आणि सत्चारित्र्य यांचा आदर्श! अशा या महान राष्ट्रपुरुषाच्या जीवनातील काही प्रसंग----

(—हे निवेदन चालू असतानाच पडदा हळूहळू वर जातो)

(दृश्य : शिवाजीराजांच्या खास दिवाणखान्यात काही सरदार आहेत)

**शिवाजी** : चिमणाजी,

**चिमणाजी** : आज्ञा महाराज.

**शिवाजी :** सोनोपंत डबीर तहाची बोलणी करण्यासाठी शाहिस्तेखानाकडं रवाना झाले होते...

**चिमणाजी :** होय महाराज पण अद्याप परतले नाहीत ते.

**नेताजी :** एव्हाना यायला हवे होते. अंमळ उशीरच झालाय त्यांना.

**शिवाजी :** चाकणचा किल्ला शाहिस्तेखानानं मोठ्या हिकमतीनं सर केला.त्या विजयानं माज आल्यासारखा खान पुणे शहरात धुमाकूळ मांडून राहिला. त्या उन्मादामुळं कदाचित त्यानं तहाच्या बोलण्याला वाटाण्याच्या अक्षता लावल्या असतील. चिमणाजी...

**चिमणाजी :** काय महाराज ?

**शिवाजी :** बाजीप्रभूंच्याबाबत सुनावलेल्या हुकमाची तामिली झाली ना ?

**चिमणाजी :** अलबत. त्यात शंका कसली महाराज ? पराक्रमी बाजीप्रभू देश-पाडयांच्या नावानं पावनखिडीच्या प्रवेशभागीच तुलसीवृंदावन बांधलंय. महाराज, स्वराष्ट्र अन् स्वधर्मासाठी बलिदान करून पुण्यशील ठरलेल्या बाजीप्रभूंच्या स्मरणार्थ घोडखिडीचं पावनखिड असं नामाभिधान ठेवल्याची द्वाही फिरवली आहे.

**शिवाजी :** असे मोहरे देशाला लाभलेत म्हणूनच मऱ्हाठी राज्य स्थापण्याचं आमच स्वप्न साकार होणार यात तिळमात्र शंका नाही. हे तो 'श्रीं' ची इच्छा. बाजीप्रभूंच्या पराक्रमाची याद साऱ्यांना स्फूर्तिदायी ठरेल. अवघ्या तीनशे मावळ्यांनिशी प्राणाची बाजी लावून बाजी लढले. अंगावर जखमांचं जाळं झालं. सारं शरीर रक्तानं न्हाऊन निघालं. परंतु तोफांचे पाच आवाज ऐकू येईपर्यंत बाजी झुंजत होते. धन्य तो वीर. धन्य त्याचा पराक्रम. पण हे काय अजून सोनोपंत... ...

(हुजऱ्या प्रवेश करतो.)

**हुजऱ्या :** मुजरा करतो महाराज. सोनोपंत डबीर आले आहेत.

**शिवाजी :** येऊ देत त्यांना आत.

(सोनोपंत प्रवेश करतात.)

**चिमणाजी** : सोनोपंत, काही विशेष खबर ?

**सोनोपंत :** अं......अं .....!

**शिवाजी :** बोला, बोला सोनोपंत असे चाचरताय कशाला ? तुमचा उतरलेला चेहरा आणि तुमचं अडखळत बोलणं यावरून आम्ही काय ते उमगलो आहोत. उभी हयात राजकारणात घालविलीत. रोहिडेश्वरावर शपथ घेताना आम्ही माणसं जोडण्यास सुरवात केली. त्याचबरोबर प्रत्येक मावळ्यागणिक एकएक गड स्वराज्यासाठी मिळविला. तेव्हापासून माणसाच्या मुद्रेवरून त्याच्या अंतरंगात उतरण्याची थोडी फार किमया साधली आहे आम्हाला !

**सोनो. :** तसं नाही महाराज. पण...

**शिवाजी** : तसं नाही अन् असं नाही, तर मग आहे तरी कसं ? पंत, राजकारणात गुळमुळीत भाषा काय कामाची ? बोलण्यातील ढिलाई मोठी घातक ठरते. या ढिलाईपायी प्रसंगी माणसाच्या मानेला फास देखील लागायचा. तह म्हटला की बोलणी यशदायी झालीच पाहिजेत असा काही राजकारणात नियम नाही. उलट तहाची बोलणी फिसकटायचीच असंच इतिहासानं अनेक प्रसंगातून दाखवून दिलं आहे. तेव्हा पंत, काय ते स्पष्ट बोला.

**सोनो. :** महाराज, आपण पन्हाळ्याहून सुखरूप सुटलात ही वार्ता शाहिस्तेखानाच्या कानी आहे. त्यामुळं तो दबला देखील आहे पण...

**शिवाजी** : पण मग्रुरी उतरलेली दिसत नाही. या मुजोर खानाचा दिमाख उतरवल्याशिवाय त्याची घमेंड कमी व्हायची नाही. फाजलखान, रूस्तुमेजमान, सादतखान ही खानसाहेबांची मालिका, पराभवानं काळी ठिक्कर पडलेली त्यांची तोंडं घेऊन बादशहाकडं परतल्याचं शाहिस्तेखानाच्या गावी नाही वाटतं ? तेव्हा पंत, शाहिस्ता नेमकं काय बोलला ते जाणून घेण्याची आम्हास फार इच्छा आहे.

**सोनो. :** महाराज, शाहिस्ता म्हणतो, "बादशहाच्या दरबारी अल्लाची कसम घेऊन शिवाजीला कैद करतो. गडकोट मुलूख घेऊन फत्ते करतो असं वचन दिलंय. त्या बंडखोरांची किंमत माझ्या बोटांच्या वाढलेल्या नखाएवढीच."

**नेताजी :** काय तो शाहिस्ता असं म्हणाला ? महाराजांचा हा घोर अपमान आम्ही कदापि सहन करणार नाही. अन् सोनोपंत, तुम्ही तरी निरोप सांगताना काही तोल सांभाळायचा होतात.

**शिवाजी** : नाही नेताजी. पंत बोलले ते उचित होय. त्यांनी शब्द ऐकवले शाहिस्तेखानाचे. ते शब्द ऐकताना सोनोपंतांच्या जिवाची काहिली झाली असेल.

**सोनोपंत :** (घाईने) होय महाराज. अगदी बरोबर. शाहिस्ताचा एक एक शब्द ऐकून जिवाची नुसती घालमेल चालली होती. त्याचा एक एक शब्द कानात तापलेलं शिसं ओतावं तसा वाटत होता. वाटत होतं त्या क्षणीच त्या नराधमाच्या नरडीचा घोट घ्यावा, किंवा त्याची आतडी बाहेर काढावीत असं एकसारखं वाटत होतं. पण महाराजांच्या राजनीतीचा न्याय आड आला. मऱ्हाठी राज्याचा प्रतिनिधी म्हणून गेलो असल्यानं शब्द देखील जपून, तोलून-मापून वापरत होतो. महाराजांची शान राखली जाईल, कुठल्याही तऱ्हेनं मऱ्हाठी राज्याच्या इभ्रतीस थोडा देखील कलंक लागणार नाही, यासाठी सारा क्रोध गिळून अतिशय सावधगिरीनं बोलत होतो.

**शिवाजी :** अगदी योग्य तेच केलंत पंत. विवेकाचा लगाम घाळून अनावर झालेल्या क्रोधास आवर घातलात. शत्रूच्या छावणीत आमची मान उंच राहील असेच वागलात, त्याबद्दल ही घ्या बक्षिसी. (कंठा काढून देतात.)

**सोनो.** : कशाला महाराज ?

**शिवाजी** : (हातानं खुणावीत) असू द्यात. स्वीकार करा. गुणाचं चीज व्हावं, इतरांनी देखील सद्वर्तनाची बूज राखावी, सद्चारित्र्याचा आदर्श ठेवावा केवळ यासाठी ही भेट. ही भेट आहे हिंदवी स्वराज्याच्या एका मानकऱ्याला, त्याच्या उत्तम कामगिरीबद्दल.

**चिमणाजी** : महाराज, पण शाहिस्त्याचं काय ?

**शिवाजी** : योग्य प्रश्न विचारलात चिमणाजी. गनिमाची आतडी नारसिंहाप्रमाणे आम्ही काढून दाखवली. त्या प्रतापगडाच्या युद्धाची या नव्या खानाला याद दिली पाहिजे. तो वाढलेल्या नखाइतकादेखील आम्हाला मानत नाही.

मला वाटतं त्याच्या हातापायाच्या बोटांची मोजदाद करून देण्याची वेळ येऊन ठेपली आहे. तेव्हा आता खानावर स्वारी करण्याचा बेत पक्का.

**नेताजी** : पण केव्हा ?

**शिवाजी** . पण बहिर्जी कसा आला नाही अजून ?
(कोणी एक यवन 'सलाम आलेकुम' 'सलाम आलेकुम' असे म्हणत प्रवेश करतो. त्याला पहारेकऱ्याने धरून आणलेले असते.)

**मोरोपंत** : पहारेकरी, कोण हा आडदांड धटिंगण ?

**पहारेकरी** : महाराज, हा सलामतखान.

**बहिर्जी** : सलामत नहीं बलामत कहो बलामत !

**पहारेकरी** : हां तेच ते. सलामत काय; बलामत काय ? तर महाराज, हा बलामतखान आपण शाहिस्तेखानच्या दरबारातून आल्याचं सांगतोय. आपली भेट मागत होता. मी विचारून येतो म्हटलं तर याला दम नाही निघाला. घसमुसळ्यासारखा हा शिरला आत.

**बहिर्जी** : हां हां ! हा बलामतखान खुदाकी तरह केव्हाही, कुठंही जातो. ह्या अल्लाच्या फरिस्त्याला कुणी मज्जाव करू शकत नाही.

**शिवाजी** . खानसाहेब, आपण लालमहालातून आला असाल ?

**बहिर्जी** . अलबत ! महाराजांना शक आहे का ? शंका तर नाही ? लालमहालात आमचा हमेशा वावर असतो. शाहिस्तेखानचा हा बलामत आहे. माझी काही अर्जी आहे ?

**शिवाजी** : अर्जी ? कसली अर्जी ?

**बहिर्जी** : महाराज, पूनामें माझ्या घरी माझ्या भतीजीची शादी आहे. आपण या शादीसाठी जरूर यावं म्हणून अर्जी करायला आलो आहे मी. मोठी दावत देणार आहें मी.

**शिवाजी** पण का ? शाहिस्तेखानची ह्याला इजाजत आहे का ? जसवंतसिंहासारखे सुमारे साठ मातब्बर सरदार त्यांच्या पाऊण लाख फौजेसह पुण्यास वेढा घालून राहिले आहेत. त्यातून आम्हाला प्रवेश कसा मिळणार ?

**बहिर्जी :** त्याची तुम्ही फिक्र करू नका. पुरा बंदोबस्त करून आलो आहे मी.

**शिवाजी :** छे ! मला ते शक्य वाटत नाही. त्या कडक पहाऱ्यातून शाहिस्ते-खानाच्या स्वप्नात देखील जाता येईल असं वाटत नाही. शिवाय बलामतखान, आम्ही तुझ्या घरच्या शादीला यावं हा तुझा आग्रह कशापायी ?

**बहिर्जी :** (गहिवरून) महाराज, आमचे बापजादे पिढ्यान् पिढ्या तुमचं नमक खात आले आहेत. त्या सर्वांची उभी हयात तुमच्या मराठी राज्यात गेली. मराठी मातीतच ते सारे वाढले पण राजा, तुम्ही कधी त्यांच्या केसाला धक्का लावला नाही.

**चिमणाजी :** ती तर छत्रपतींच्या राज्याची नीती आहे. गो-ब्राह्मणांचं प्रति-पालन आणि स्त्रियांच रक्षण हे आमचे राजे परमपवित्र कर्तव्य मानतात. त्याचबरोबर शत्रू देखील सीधासाधा वागत असेल तर राजांचं त्याला अभय असतं.

**बहिर्जी :** मालूम आहे मालूम आहे मला.

**शिवाजी :** ते ठीक आहे खानसाहेब. तुमच्या वाडवडिलांची गोष्ट निराळी तुमची गोष्ट निराळी. तुम्ही तर खानांच्या पदरी आहात.

**बहिर्जी :** म्हणून काय झालं? माझ्या रक्तात माझ्या वाडवडिलांचा वारसा आला आहे. तेवढ्यासाठी माझी विनंती. या शादीला तुम्ही आलंच पाहिजे. महाराज, नाही म्हणू नका.

**शिवाजी :** पण तुमचा भरोसा काय ? काही दगाफटका झाला तर ?

**बहिर्जी :** नाही महाराज, कसम घेऊन सांगतो. तसं काही करणार नाही.

**शिवाजी :** त्यासाठी पुरावा, खातरजमा ?

**बहिर्जी :** काय केलं म्हणजे तुम्हाला भरोसा वाटेल ? छाती फाडली तरी मराठी राज्याविषयी आदर आढळेल तुम्हाला.

**मोरोपंत :** तुमच्या नुसत्या शब्दावर विश्वास कसा ठेवायचा आम्ही ?

**बहिर्जी** सच आहे तुमचं म्हणणं. त्यासाठी काही करूनच दाखवलं पाहिजे. काय सबूत देऊ ? माझा कलेजा फाडून दाखवू की माझं बोट कापून त्या

रक्तानं महाराजांच्या माथा टिळा लावू ?

**सर्जेराव** : एक यवन, तो देखील शत्रूपक्षाकडील असून, एवढी निष्ठा ?

**शिवाजी** : सर्जेराव, त्याच्या वागण्यावर भुलू नका. शत्रूला गाफील ठेवायचं असेल तर प्रसंगी असं अग्निदिव्य देखील करावं लागतं. शिवा न्हाव्यानं नाही का आमचं सोंग घेऊन आमच्यासाठी प्राण दिले.

**बहिर्जी** : महाराज, महाराज.

**शिवाजी** : थांबा खानसाहेब, अधिक बोलू नका. माझ्या अन्य सरदारांना तुमचं मोठेपण सांगू द्या मला. चिमणाजी, सर्जेराव, पंत, रोहिडेश्वरावर शिव-शंभूला स्वत:च्या रक्ताचा अभिषेक घातल्याची परंपरा अजूनही चालतच आहे त्याचा आहे हा पुरावा. तुम्ही या खानसाहेबांना अजून ओळखलंच नाहीत.

**मोरोपंत** : म्हणजे कोण आहेत हे ?

**शिवाजी** : पंत, हृदयाची ओळख हृदयालाच पटते. त्यासाठी मन, कान, डोळे खूप संवेदनाक्षम ठेवावे लागतात. अहो, हा बलामतखान नसून हा आहे हिंदवी स्वराज्याचा एक सच्चा पाईक बहिर्जी नाईक.

**सगळे** : (आश्चर्याने, एकदम.) कोण बहिर्जी ?

**शिवाजी** : होय बहिर्जी. जिवाला जीव देणारा तुमच्या सारखाच एक मराठा. ये, बहिर्जी ये. कडकडून मिठी मार. जिवावर उदार होऊन जिवाला जीव देणारे तुमच्यासारखे शूर योद्धे असताना काय बिशाद आहे शत्रूची मराठी राज्याकडं वाकडा डोळा करून पाहाण्याची. राक्षसांसारखे एका शाहिस्तेखाना-तून अनेक हजारो शाहिस्तेखान जरी जन्मले तरी त्यांची चुटकीसरशी खांडोळी करू. (शिवाजी बहिर्जीला मिठी मारतात.) आजच्या या प्रसंगाची आठवण म्हणून हे कडं आम्ही तुम्हास बक्षीस देतो.

**बहिर्जी** : (महाराजांना थांबवीत, शेल्यावर हात ठेवत) नको, नको. धनी काही नको मला. सेवकाची चाकरी आपल्या पदरी रुजू झाली यातच समाधान

आहे. तुम्ही चाकराला छातीशी धरलंत धन्य झालो मी. राजे, दिल मोठा आहे तुमचा. बस, बस, बस ! राजे आयुष्याचं सोनं झालं. सेतू बांधताना रामानं खारीला शाबासकी दिली त्याची आठवण झाली आज. राजे, मराठी राज्य-स्थापनेच्या मार्गात काटयाप्रमाणे सलणाऱ्या यवनांचा नि:पात करा. एवढंच मागणं आहे.

**नेताजी :** बहिर्जी, पुण्याभोवती शाहिस्तेखानाचा कडक पहारा आहे. मुंगीदेखील आत शिरली तर शाहिस्तेखानाला सुगावा लागतो म्हणतात. अन् महाराज तर लालमहालावर हल्ला करायचा म्हणतात.

**बहिर्जी :** मग तसंच होईल. तुम्ही मुळीच काळजी करू नका. समदा बंदोबस्त करून आलोय मी. सारी बितंबातमी आणली आहे.

**शिवाजी :** चिमणाजी, नेताजी पुण्याची अन् लालमहालाची तुम्हाला खडान् खडा माहिती आहे. तेव्हा या मोहिमेवर तुम्ही बरोबर असायचं.

**चिमणाजी** : जशी आज्ञा महाराज.

**बहिर्जी** : महाराज, आपल्याला याच महिन्यात चढाई केली पाहिजे.

**शिवाजी :** का रे बाबा, काही विशेष?

**बहिर्जी** : होय महाराज, हा आहे रमजानचा महिना.सारी मोगल फौज दिवसभर उपास करते. सहाजिकच रात्री सारी मंडळी सपाटून जेवतात. मग काय ? खाना झाल्यावर जमिनीला पाठ लागताच सारे मुड्यावानी पडतात.

**शिवाजी :** त्या बेसावध क्षणीच आपण हल्ला करायचा. पण पुण्यात शिरकाव कसा करायचा हा मूळ प्रश्न रहातोच.

**बहिर्जी :** त्याची देखील तजवीज केली आहे मी. चार दिसांनी पुण्यात एका मराठा गड्याचं लगीन हाय. रात्री उशीरानं लग्नाची वरात वेशीबाहेरील देवळात दर्शनास जाईल. त्याच वेळी तुम्ही वेष पालटून वरातीत सामील व्हायचं.

**नेताजी** : महाराज, एकदा का आपण गावात गेलो की, उशीर न लावता

तुम्हाला लालमहालापर्यंत पोहोचवायची जोखीम माझी.

**बहिर्जी** . लालमहालातील मुदपाकखान्याला लागून खानानं स्वतःचा आलिशान महाल सजवला आहे. खाणं झालं की खानाच्या महालात असतं गाणं बजावणं. त्यावेळी रंगीन कपडे घातलेला खान शस्त्रापासून दूरच असतो. हा मोका साधून लक्ष्य टिपायचं की काम फत्तेच.

**शिवाजी** : ठीक आहे. लागा कामाला. आम्ही भवानीमातेचं दर्शन घेऊन येतो. मासाहेबांचे आशीर्वाद घेऊन येतो. उद्या सकाळी लढाईचा तपशील दिला जाईल. सगळे लग्नाच्या तयारीला लागा. खानसाहेब, बलामतखान यांच्याकडे आपल्याला लग्नाला जायचंय. व्याही मंडळी कोणी व्हायचं, मामा–काका कोणी व्हायचं ठरवून घ्या चला. (सगळे हसतात व जातात. काळोख. आता झिरझिरीत पडद्याच्या पलीकडे शिवाजी भवानीमातेचं दर्शन घेत असून जिजामाता शेजारी उभ्या आहेत असे दृश्य. पुन्हा क्षणभर अंधार. पुनः त्या झिरमिरीत पडद्याआडच लग्नाची वरात जात असल्याचे दृश्य. ही वरात अतिशय संथपणे जावी व नंतर वरातीने दुसऱ्या विंगेतून रंगमंचावर यावे. नवरामुलगा इ. खरे वऱ्हाडी गेल्यानंतर शिवाजी व चार सहा मावळे फक्त रंगमंचावर थांबतात.)

**चिमणाजी :** महाराज, आता आपल्याला वरातीबरोबर जाता यायचं नाही.

**शिवाजी** : कारण ?

**चिमणाजी** : बहिर्जीच्या सांगण्याप्रमाणं वरात ज्या बाजूला जाणार तेथून लालमहालाचा रस्ता वेगळा आहे. तेव्हा आता आपणाला वऱ्हाडी म्हणून न जाता साध्या शिपायांसारखं जावं लागेल.

**शिवाजी :** तर मग सावध. शत्रूचा पहारा कडक आहे. प्रसंग पडलाच तर...

**सर्जेराव** . (म्यान्यातून तलवार उपसत) आहे ना माझी तलवार......

**शिवाजी** सबूर, सबूर. सर्जेराव असे उतावीळ होऊ नका. तुमच्या पराक्रमाचे झेंडे फडकले आहेत, हे का आम्हास ठाऊक नाही. परंतु प्रसंगी शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ ठरते हे लक्षात ठेवा. आपण शत्रूच्या जवडयातच उडी घेतली

आहे. त्याला तोंड मिटू न देता यमसदनास पाठवायचं आहे. मात्र घाई उपयोगाची नाही. शत्रूचे कुणी पहारेकरी......

**नेताजी :** हो कुणी यवन पहारेकरी इकडेच येत आहेत.

**शिवाजी :** दुष्टांचा विचार यायचा अवकाश. राक्षस समोर हजर. सर्जेराव, चिमाजी, नेताजी.

**सगळे :** आज्ञा महाराज.

**शिवाजी :** आता मीं महाराज नाही की तुम्ही माझे सेवक नाहीत. आपण आहोत मुशाफिरे परमुलखातले......

**सर्जेराव :** पण नेमके कुठले......? काय......

(दोघे पहारेकरी समोरासमोरच्या विंगेतून प्रवेश करतात.)

**प. पहारेकरी :** सलाम आलेकुम.

**दु. पहारेकरी :** आलेकुम सलाम.

**सर्जेराव :** सलाम.

**नेताजी :** सलाम सलाम.

**पहारेकरी :** कहाँ जा रहे हो !

**सर्जेराव :** किधर नाही. ते तिकडे पहाऱ्यावरच निघालो बघा.

**दु. पहारेकरी :** पहारेपे ! आँ तुम्हे कभी देखा नही !

**प. पहारेकरी :** तुम्हे देखा ऐसी याद नही नाम क्या तुम्हारा ? आँ नाम क्या ?

**सर्जेराव :** मी सम्मदखान.

**नेताजी :** अन् मी निमायतखान.

**शिवाजी :** हाँ हाँ आम्ही कटकहून आलो म्हणून तुम्ही पहचानला नाही.

**प. पहारेकरी :** कटकहून बोलवले तुम्हाला?

**सर्जेराव** : हाँ हाँ. चौकी पहाऱ्यासाठी.

**दु. पहारेकरी** : हाँ रे हाँ युसुफ. ते बिछान्याचे पहाऱ्यासाठी खानसाहेबांनी कटकहून जादा लोग मागवले ते हे दिसताहेत.

**नेताजी** : वैसा नही खानसाहेब.

**दु. पहारेकरी** : वैसा नही फिर कैसा?

**नेताजी** : तुम्ही बिछान्याचे पहाऱ्यासाठी म्हटला की ते गलत. एकदम चूक. आम्ही छबिन्याच्या पहाऱ्यासाठी, देवीच्या छबिन्याच्या पहाऱ्यासाठी आलो आहोत.

**प. पहारेकरी** : (हसून) याकूब अरे हे सांगताहेत ते बराबर. बिछान्याच्या (अभिनय करीत) नाही छबिन्याच्या.

**दोघे पहारेकरी** : बिछान्याच्या नाही छबिन्याच्या. (सगळे हसतात.)

**प. पहारेकरी** : मग इकडं कुठं गेला होतात.

**चिमणाजी** : शादीची वरात होती. त्यात शामील झालो होतो आम्ही.

**दु. पहारेकरी** : हां त्या महमदची शादी. ठीक है ठीक है जाव. माशाल्ला सुभानल्ला.

**सगळे** : माशाल्ला सुभानल्ला.

(दोघे पहारेकरी निघून जातात.)

**चिमणाजी** : हुश्श. सुटलो एकदाचे.

**शिवाजी** : चिमणाजी, हे तर काहीच नाही. लोखंडी पिंजऱ्यात जरी आम्हाला गिरफदार केलं तरी आम्ही सुटून जाऊ.

**नेताजी** : पण महाराज,

**शिवाजी** : काय नेताजी?

**नेताजी** : महाराज, समजा कुणी ओळखलंच तर–

**शिवाजी :** तर आहेच ही भवानी तलवार. मग कुणाची गय नाही करायची. तुम्ही इथं पहारा द्या' आम्ही पुढं कूच करतो. आलवेलचा इशारा आम्ही देऊ. मगच या तुम्ही. जय भवानी (जातात)

**प. मावळा :** (विंगेत मुदपाकखान्यात डोकावत) हा ऽऽ लाडू.

**दु. मावळा :** लाडू ऽऽ वा! बुंदीचे दिसताहेत. शिवाय सुरकुंबा, शेवया...... वा वा मस्त गोड वास येतोय. माझ्या नाकाला कशा गुदगुल्या करतोय.

**प. मावळा :** ए गप्प बैस रे. मोह फार वाईट. एकदा का मोह निर्माण झाला की (विंगकडे पहात) ओढ निर्माण होते. मग माणूस त्यात गुरफटून जातो आणि (मान डोलावत विंगेच्या कडेला बैठक मारतो)

**दु. मावळा :** ए ऊठ, कुणी यवन शिपाई इकडे येताहेत.

**प. मावळा :** हो रे हो. बहुधा जेवण जरा जास्त झालेलं दिसतंय.

**दु. मावळा :** हो ना —— पोटाला तड लागेपर्यंत जेवल्यानं सुस्त झालेली दिसतेय जोडी.

(दोघे यवन शिपाई येतात)

**प. शिपाई :** कौन है रे तुम?

**प. मावळा :** आम्ही...आम्ही ना चौकीदार.

**दु. शिपाई .** चौकीदार, इथला रिवाज ठाऊक नाही का? आ ऽऽ आम्हाला सलाम नाही केला. कर सलाम. कर सलाम नाही तर तेरा कबाब बनाऊंगा।

**दु. मावळा ·** नको नको सरकार. आम्ही येथे नये आलो आहोत. कटकहून आलेले आम्ही पहारेकरी. इथंच आमची नेमणूक झालीय.

**प. शिपाई ·** इधर... ह्या भटारखान्यावर नेमणूक.

**प. मावळा :** हाँ ऽऽ इथंच झालीय. ह्या मुदपाकखान्यातून खानसाहेबांच्या खास महालात रस्ता आहे ना. म्हणून इथं नेमणूक झाली आमची.

**प. शिपाई :** हाँ ऽऽ हा ठीक आहे. (दुसऱ्या शिपायास उद्देशून) चल रे,

उगाच वक्त गमावू नको. शिवाजी भोसलाला पकडून इनाम उपटायचं ना आपल्याला.

**दु. शिपाई :** हो रे हो. मी तर विसरलोच होतो. वो कंबख्त शिवाजी ... ... डोंगरका चुवा मिळाला तर मी त्याचा असा खिमा करीन... की...

**प. शिपाई :** मी त्याचा अस्सा कबाब बनवीन की बस्स!

**प. मावळा :** बहोत खूब--बहोत अच्छे खानसाहब आपकी तारीफ.

**प. शिपाई :** मला तिस्मारखान म्हणतात.

**दु. मावळा :** म्हणजे एका फटक्यात तीस (हळू आवाजात माशा) मारणारे तुम्हीच.

**प. शिपाई :** हा ऽऽ तो मीच. अन् माझा हा दोस्त बहाद्दरखान.

**प. मावळा :** दिसतात खरे बहादूर. पण खरं म्हटले तर तुमच्यापेक्षा थोडे कमीच.

**दु. शिपाई :** काय मी ह्याच्यापेक्षा कमी बहादूर.

**प. मावळा :** नाही म्हणजे मला तसं वाटलं.

**दु. मावळा** . छे! मला नाही तसं वाटत. मला तर तिस्मारखानच थोडे कमी वाटतात.

**प. शिपाई** अरे काय बकवास लावलायस. बंद कर तुझी बडबड.

**दु. मावळा :** माफ करा खानसाब. जे वाटलं ते स्पष्ट बोललो. चुकलो असेल तर माफी करा.

**दु. शिपाई :** अरे कोणाची माफी मागतोस. काही चुकलं नाही. अगदी योग्य तेच बोललास तू. हा बहाद्दरखान आता त्याची बहादुरी दिखायेगा. ह्या तिस्मारखानाला दोन मिनिटात नाही 'अल्ला' म्हणायला लावलं तर हा खरा बहाद्दरखानच नव्हे.

**प मावळा :** खरंय तुमचं खानसाहेब.

**प. शिपाई :** अबे चूप. तिस्मारखानाला तू अजून ओळखलंच नाहीस. हा फडतूस बहाद्दरखान लगेचच बिस्मिल्ला म्हणल्याचं तुला ऐकायला येईल. अरे वो खान् बहादूर, हो लडनेको तैयार. आता तुझाच कबाब बनवतो.

**दु. शिपाई :** अरे भाग. तुझा खिमा करून माझ्या कुत्र्याला देऊन टाकतो बघ.

(दोघे खान लढतात व दोघेही बेशुद्ध होतात)

**प. मावळा :** चल रे दोस्ता. घे त्याचे कपडे अन् हो बहादूरखान.

**दु. मावळा :** अन् तू हो तिस्मारखान. (दोघे हसत रहातात. अंधार.)

(गाणं बजावण्याचे दूरवरून आवाज ऐकायला येताहेत. महाराज, सर्जेराव प्रवेश करतात.)

**सर्जेराव :** महाराज, नाच–गाण्याचा हा आवाज खास शाहिस्तेखानाच्या महालातूनच येतो आहे. मैफल कशी छान जमलेली दिसते. सारी मंडळी त्यात दंग असतील.

**शिवाजी :** अन् धुंद देखील. नेताजी, सर्जेराव ही धुंदी मोठी वाईट. हिच्या-पायीच कितीकांच्या संसाराची धुळधाण होते. इतकंच नव्हे तर मोठमोठाली राज्यं धुळीस मिळतात. सत्ता आणि पैशाचा मोह ही धुंदी निर्माण करतो. ही धुंदी उतरते तेव्हा सारं काही खलास झालेलं असतं.

**चिमणाजी :** (बाजूच्याच विंगेकडे बोट दाखवीत.) महाराज, येथून मुदपाक-खान्यात जाण्यास रस्ता आहे तेथूनच नेमक्या शाहिस्तेखानाच्या महालाची वाट आहे.

**प. मावळा :** (टाचा उंचावीत मुदपाकखान्याकडे नजर टाकतो.) हा ऽ ऽ लाडू, जिलेबी दिसताहेत.

**दु. मावळा :** सुरकुंबा, शेवयाचा वास येतोय.

**नेताजी :** अरे, गड्या मोह हा भारी वाईट हे आत्ताच महाराजांनी सांगितलेलं नाही का शिरलं अजून तुझ्या टाळक्यात. (त्याच्या डोक्यावर टप्पल मारीत) चल हो म्होरं.

(सर्वजण विंगेतून जातात. क्षणभर काळोख) (शाहिस्तेखानाच्या महालाचे मैफिलीस साजेसे दृश्य, नर्तकी नृत्य करीत असते. त्याचवेळी मुदपाकखान्यातून 'दगा दगा', 'हर हर महादेव' असा आरडाओरडा होतो. त्या पाठोपाठ एक मुसलमान पहारेकरी 'दगा, दगा' असे ओरडत येतो. पाठोपाठ किंकाळ्यांचे आवाज)

शाहिस्तेखान : ये क्या हो रहा है? कौन चिल्लाता है?

पहारेकरी : मरहट्टे आयें हैं। शिवाजी आया है हुजूर।

शाहिस्तेखान : बुद्दू! शराबकी नशामे तो नही। वह पहाडका चूहा यहा कैसे आएगा–

(तेवढ्यात आतून पुन्हा 'दगा, दगा', 'मर गया', 'बचाओ' असे आवाज आणि किंकाळ्या ऐकायला येतात)

(अंधार होतो)

शिवाजी : हा कोण मरून पडलाय इथं.

सर्जेराव : हा खानाचा जावई महाराज.

शिवाजी : म्हणजे अजून खानाला आमची समशेर भिडलीच नाही तर. (एक मुसलमान पहारेकरी धावत येतो)

पहारेकरी : हुजूर– हुजूर– भाग जायिए– शिवाजी और उसके मरहट्टे आपके इधर — (समई विझवतो – अंधूक उजेड)

शाहिस्तेखान : क्या बक रहे हो —

पहारेकरी : पहले आप भाग जायिए हुजूर —

(किंकाळ्यांचे आवाज वाढतात)

शाहिस्तेखान : समशेर दो– मेरी समशेर —

(पळापळीचे आवाज)

पहारेकरी : खुदा के लिये भाग जायिए हुजूर–

**सर्जेराव :** (प्रवेश करून) अखेर खान सापडला महाराज– (तलवारीचा घाव मारतो–तो पहारेकऱ्याला लागतो–)

**पहारेकरी :** या अल्ला! भाग जायिए हुजूर –! मैं मैं...... (पडतो) (शाहिस्ताखान खिडकीतून उडी टाकून पळू लागतो. तेवढ्यात शिवाजी प्रवेश करून घाव घालतो. खिडकीवर घाव बसल्याचा आवाज. विव्हळण्याचा आवाज)

**सर्जेराव :** (खिडकीजवळ) पळाला – खान पळाला –

**शिवाजी :** अरेरे! शाहिस्ता सुटलाच तर अखेर –

**सर्जेराव :** होय महाराज. पण बोटं तुटलीत त्याची – हे पाहा तुकडे – त्याच्या जिवावर बेतलं होतं पण बोटावर निभावलं –

**शिवाजी :** म्हणजे शाहिस्ताला शास्त झाली एवढंच – चला आता वाड्याबाहेर. अधिक वेळ इथं थांबण्यात आता धोका आहे–

(अंधार होऊ लागतो आणि सुरवातीच्या गाण्याचे स्वर ऐकू येतात.)

(पडदा पडतों)

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. १५५६ नों. दि. २५-१-९-८४
वि. ना. ना.

IRBK-0115564